# पालीचा श्री बल्लाळेश्वर

येता दर्शनास भाद्रपद शुक्ल चतुर्थीस... सर्व मनोकामना पूर्ण होती...



## श्री क्षेत्र पाली :

पालीचा गणपती हा अष्टविनायकांपैकी आठवा गणपती आहे. या गणपतीला श्री बल्लाळेश्वर म्हणतात. बल्लाळेश्वर गणपतीचे हे स्वयंभू स्थान आहे. हे स्थान रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात असून, सुधागड या भव्य किल्ल्याची पार्श्वभूमी व अंबा नदीच्या निसर्गरम्य सान्निध्यात बल्लाळेश्वराचे मंदिर वसले आहे. पालीपासून जवळच उन्हेरचे गरम पाण्याचे झरे व सरसगड हा प्राचिन किल्ला आहे. पाली खोपोलीपासून ३८ कि.मी. अंतरावर आहे तर पुण्यापासून १११ कि.मी. अंतरावर आहे.

## बल्लाळेश्वराचे देवालय :

पाली क्षेत्रामध्ये प्रवेश केल्यावर प्रथम लागते ते छोटेसे बल्लाळेश्वर मंदिर. त्यात बल्लाळावर प्रसन्न झाली ती भव्य मूर्ती आहे. तिला ढुंढिराज विनायक म्हणतात. त्यानंतर दुसरे मोठे मंदीर बल्लाळेश्वराचे आहे. ते देऊळ फार रमणीय असून त्याचे तोंड पूर्वेकडे आहे. सूर्योदय होताच सूर्याचे किरण सभामंडपातून येऊन मूर्तीवर पडतात अशी देवालयाची बांधणी साधलेली आहे. बांधकाम चिरेबंदी असून त्या प्रचंड चिऱ्यांच्या बांधकामात शिसे ओतून भिंती अत्यंत मजबूत केल्या आहेत, त्यामुळे ते भुईकोट किल्याप्रमाणे झाले आहे. गाभाऱ्यात नक्षीकामाचे दगडी मखर आहे. देवालयात पुढे सभामंडप आहे. गाभारा १५ फूट उंच आहे आणि बाहेरील उंदराचा गाभारा १२ फूट उंच आहे. त्यामध्ये उंदराची मूर्ती हातात मोदक घेऊन गजाननाकडे बघत आहे. या मूर्तीसमोर शिवाचाही मुखवटा आहे. उंदराच्या गाभाऱ्यात देवीच्या दोन मूर्ती आहेत व त्या पालखीच्या वेळी मिरविल्या जातात. देवळाबाहेरचा सभामंडप ४० फूट लांब व २० फूट रुंद आहे व त्याला सुरूचे खांब आहेत. मंदिरासमोर दोन तळी व घाट आहेत; ती पाण्याने नेहमीच भरलेली असतात, पण पाणी स्वच्छ नाही. एक मोठी घंटा बाहेरच्या कमानीत आहे. या देवळाच्या मागच्या बाजूस श्रीधुंडीविनायकाचे देऊळ असून त्यात श्रीधुंडीविनायकाची मूर्ती स्वयंभू आहे.

## श्री बल्लाळेश्वराची मूर्ती :

गाभाऱ्यात बल्लाळविनायकाची मूर्ती ३ फूट उंचीची पण रुंदट आहे. कपाळाचा काही भाग खोलगट असून मुखभाग चांगलाच स्पष्ट आहे. सोंड डावीकडे झुकलेली असून बेंबीत व डोळयात चकचकीत हिरे आहेत. मूर्ती दगडी सिंहासनावर बसलेली असून सिंहासन मूर्तीचे भोवती जडविलेले आहे. मूर्तीच्या बेंबीपासूनचा भाग सिंहासनाच्या वर दिसतो. त्यावर ऋद्धिसिद्धी चवऱ्या हलवीत उभ्या आहेत.

## नैमित्तीक उत्सव :

भाद्रपद व माघ शु. १ ते ५ असे पाच दिवस दरसाल दोन उत्सव होतात. या उत्सवांना भाद्रपद चतुर्थीला रात्री महानैवेद्य, पंचमीला दहिकाला व साधे गावप्रयोजन, पाचही दिवस कथाकीर्तने असा कार्यक्रम असतो. भाद्रपद हा पावसाळी महिना असल्यामुळे या उत्सवास बाहेरगावचा समाज नसतो. माघी उत्सवाच्या वेळी पावसाची अडचण नसल्यामुळे बाहेरगावचे यात्रेकरु व मोठा समाज जमतो. सर्व कार्यक्रम भाद्रपदाप्रमाणेच; फक्त दहिकाला नसतो आणि रात्री ललित असते. दसऱ्याच्या दिवशी श्रींची पालखी निघते.

माघातील शु. ४ ला म्हणजे गणेशजन्माला - विनायकी चतुर्थीला येथे श्रीगजानन मध्यरात्री प्रत्यक्ष भोजनास येतात अशी श्रद्धा असल्याने या दिवशी येथे दर्शनार्थींची विशेष गर्दी असते.

# श्री बल्लाळेश्वरासंबंधी पौराणिक कथा :

फार प्राचिन काळी म्हणजे कृतयुगात सिंधू देशातील कोकण पल्लीर नावाच्या गावात (पाली गावात) कल्याण नावाचा एक व्यापारी राहात होता. त्याच्या पत्नीचे नाव इंदुमती. काही दिवसांनी त्यांना मुलगा झाला. त्याचे नाव बल्लाळ. बल्लाळ जसजसा मोठा होऊ लागला तसतसा त्याचा गणेशमूर्तिपूजनाकडे अधिक ओढा दिसू लागला. हळूहळू तो गणेशचिंतनात रमू लागला. त्याच्या मित्रांनाही गणेशभक्तीचे वेड लागले. बल्लाळ आपल्या मित्रांसह रानात जाऊन गणेशमूर्तीचे भजन-पूजन करु लागला. बल्लाळाच्या संगतीने मुले बिघडली अशी ओरड गावात सुरु झाली. लोक कल्याण शेठजीकडे जाऊन 'बल्लाळने आमच्या मुलांना बिघडविले' अशी तक्रार करु लागले.

आपला मुलगा इतक्या लहान वयात भक्तीमार्गाला लागला आणि त्याने आपल्याबरोबर इतर मुलांनाही वाईट नादाला लावले या विचाराने कल्याण शेठजींना राग आला. त्या रागाच्या भरातच तो एक भलामोठा सोटा घेऊन बल्लाळ ज्या रानात होता तेथे गेला. तेथे बल्लाळ आपल्या सवंगडयांसह गणेशमूर्तीची पूजा करीत होता. सारेजण गणेशाचे भजन करीत होते. बल्लाळ गणेशाच्या ध्यानात अगदी रंगून गेला होता. ते पाहून कल्याण शेठजींच्या पायाची आग मस्तकाला गेली. तो ओरडत, शिव्या देतच तेथे धावला. त्याने ती पूजा मोडून टाकली. गणेशाची मूर्ती फेकून दिली. इतर मुले भीतीने पळून गेली, पण बल्लाळ मात्र गणेश ध्यानात मग्न होता. कल्याण शेठजीने बल्लाळास सोट्याने झोडपून काढले. बल्लाळ रक्तबंबाळ झाला. बेशुद्ध पडला, पण कल्याणला त्याची दया आली नाही. त्याने बल्लाळला तशा अवस्थेतच एका झाडाला वेलींनी बांधून ठेवले. कल्याण शेठ रागाने म्हणाला. 'येऊ दे तुझा गणेश आता तुला सोडवायला. घरी आलास तर ठार मारीन. तुझा नि माझा संबंध कायमचा तुटला.' असे म्हणून कल्याण शेठ निघून गेला.

थोड्या वेळाने बल्लाळ भानावर आला. त्याचे शरीर ठणकत होते. तशाच स्थितीत त्याने गणेशाचा धावा केला. "हे देवा तू विघ्ननाशक आहेत. तू आपल्या भक्तची कधीही उपेक्षा करीत नाहीस... ज्याने गणेशमूर्ती फेकली व मला मारले तो आंधळा, बहिरा, मुका व कुष्ठरोगी होईल. आता तुझे चिंतन करीतच मी देहत्याग करीन."

बल्लाळाचा धावा ऐकून विनायक-गणेश ब्राम्हण रुपात प्रगट झाला. बल्लाळाचे बंध तुटले. त्याचे शरीर होते तसे सुंदर झाले. गणेश बल्लाळाला म्हणाला. "तुला ज्याने त्रास दिला त्याला याच जन्मी नव्हे तर पुढच्या जन्मीसुद्धा अपार दुःख भोगावे लागेल. तुझ्या भक्तीने मी प्रसन्न झालो आहे. तू माझ्या भक्तीचा प्रवर्तक, श्रेष्ठ आचार्यव दीर्घायुषी होशील. आता तुला हवा तो वर माग."

तेव्हा बल्लाळ म्हणाला – “तू याच ठिकाणी कायमचे वास्तव्य करावेस व आपल्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करावयास. ही भूमी गणेश क्षेत्र म्हणून प्रसिद्ध व्हावी.”

तेव्हा गणेश म्हणाला – “तूझ्या इच्छेनुसार मी इथे ‘बल्लाळ विनायक’ या नावाने कायमचे वास्तव्य करीन. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला जे भक्त येथे येतील त्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतील.” असा वर देऊन गणेश जवळ असलेल्या एका शिळेत अंतर्धान पावला. तीच शीला आज बल्लाळेश्वर या नावाने प्रसिद्ध आहे.

